**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम -३ मधील तरतूदींच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत असलेल्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निणर्य क्रमांक- संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५३/समन्वय**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक - २४ नोव्हेंबर,२०१५**

वाचा :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१)

**प्रस्तावना :-**

राज्य शासनामार्फत राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व कालमर्यादेत लोकसेवा उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा विहित कालमर्यादेत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ प्रख्यापित केला असून तो दिनांक २८.४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाने सदर अधिनियम लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत आणि वेळोवेळी पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या सदर अधिनियमाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. सदरहू निर्गमित करण्यात आलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे मार्फत पुरविण्यात येत असलेल्या सेवा सदर अधिनियमातंर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली राज्यातील आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे, संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे सर्व संबंधित अधिकारी, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण , अध्यक्ष, जातप्रमाणपत्र पडताळणी समिती, सर्व तहसिलदार, मुख्याध्यापक, अधिक्षक, गृहपाल, वसतिगृह यांचा समावेश आहे, क्षेत्रिय व स्थानिक कार्यालयामार्फत पुरविण्यात येणा-या विविध सेवा-सुविधांचा लाभ राज्यातील लोकांना/ नागरिकांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने निर्गमित केलेल्या

महाराष्ट्र लोकसेवा हक्क आध्यादेश, २०१५ च्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मधील सेवा पुरविण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे .

सदर प्रपत्रातील एकूण १० सेवा राज्यातील या विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त,समाजकल्याण, आयुक्त, अपंग कल्याण व संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र यांनी त्यांचेशी निगडित असलेल्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम -३ नुसार अधिसूचित कराव्यात आणि सदरील सेवा लोकांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये नमूद केलेल्या सेवा, आवश्यक कागदपत्रे व विहीत कालावधी यामध्ये बदल करावयाचे अधिकार उपरोक्त कार्यालयांना असणार नाहीत. या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची मुभा संबंधित कार्यालय प्रमुखांना राहील. तसेच सदरील सेवा पुरविण्यासाठी पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी इत्यादीमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधित कार्यालयाचे कार्यालय प्रमुखांना असतील. त्यामुळे संबंधित आयुक्त/ संचालक यांनी सदरहू अधिनियमाच्या कलम -३ नुसार सेवा अधिसूचित करणे व त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी. सदर आदेशाची अंमलबजावणी सदर शासन निर्णयानुसार निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या तारखेपासून सुरु करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१५११२७१५४११९९६२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

Uttam Shivram Lonare

Digitally signed by Uttam Shivram Lonare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uttam Shivram Lonare
Date: 2015.11.27 16:04:45 +05'30'

**(उ.शि.लोणारे)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
२) सर्व सन्मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य व संसद सदस्य,
३) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,
४) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
५) सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

६) मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, (पत्राने),
७) मा. मुख्य माहीती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, (पत्राने)
८) मा.राज्य निवडणुक आयोग यांचे कार्यालय,
९) मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१०) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
११) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी,
१२) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई /नागपूर / औरंगाबाद/ (पणजी) खंडपीठ, (पत्राने)
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१९) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण,
२०) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
२१) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,
२२) अध्यक्ष, जातप्रमाणपत्र पडताळणी समिती,
२३) सर्व महानगर पालिका आयुक्त,
२४) सर्व नगर परिषद / नगरपालिका/ नगर पंचायती यांचे मुख्य अधिकारी,
२५) सर्व मंत्रालयीन विभाग,
२६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासने,
२७) निवड नस्ती -समन्वय कार्यासन.

# प्रपत्र-अ

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.५३/ समन्वय, दि. २४ नोव्हेंबर, २०१५. चे प्रपत्र

| अ.क्र. | सेवेचे नांव | सेवा पुरविणारा अधिकारी (पदनाम) | कालावधी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय वसतिगृह प्रवेश | | | | |
| | अ) मॅट्रिक पूर्व वसतिगृह प्रवेश | गृहपाल | अर्ज केल्यानंतर १ महिना | सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण | प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण |
| | ब) उच्च माध्यमिक वसतिगृह प्रवेश | गृहपाल | १५ ऑगस्ट पर्यंत | सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण | प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण |
| | क) व्यावसायिक वसतिगृह प्रवेश | गृहपाल | सप्टेंबर अखेर | सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण | प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण |
| | ड) अव्यावसायिक वसतिगृह प्रवेश | गृहपाल | सप्टेंबर अखेर | सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण | प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण |
| २ | निवासी शाळा प्रवेश | मुख्याध्यापक | जुलै अखेर | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण |
| ३ | परदेशी शिष्यवृत्ती | विशेष अधिकारी (भासशि),समाजकल्याण संचालनालय, पुणे | ऑक्टोबर अखेर | उपायुक्त, (शिक्षण), समाज कल्याण | सहआयुक्त, (शिक्षण), समाजकल्याण |
| ४ | देशातंर्गत शिष्यवृत्ती | विशेष अधिकारी (भासशि),समाजकल्याण संचालनालय, पुणे | ऑक्टोबर अखेर | उप आयुक्त, (शिक्षण), समाज कल्याण | सहआयुक्त, (शिक्षण), समाजकल्याण |
| ५ | अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती अत्याचारात बळी पडलेल्या सदस्यांना अर्थसहाय्य | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | गुन्हा घडल्यानंतर १ महिना | जिल्हाधिकारी, | आयुक्त, समाजकल्याण |
| ६ | ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देणे | तहसिलदार | अर्ज प्राप्त झाल्यापासून १ महिना | उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ७ | संजय गांधी निराधार योजना/ श्रावणबाळ पेन्शन योजनेतंर्गत प्राप्त अर्जावर निर्णय घेणे | तहसिलदार, संजय गांधी निराधार योजना | अर्ज प्राप्त झाल्यापासून १ महिना | उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | जात प्रमाणपत्र पडताळणी | अध्यक्ष, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती | अर्ज प्राप्त झाल्यापासून ३ महिने | महासंचालक, बार्टी, पुणे | प्र. सचिव/ सचिव, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग |
| ९ | अपंगांना ओळखपत्र देणे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. | अर्ज प्राप्त झाल्यापासून १ महिना | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प | मुख्य कार्यकारी अधिकारी , जि.प. |
| १० | अपंग विद्यार्थ्यांना शासकीय/ शासन मान्य अनुदानित अपंग शाळेत/ कर्मशाळेत प्रवेश देणे | अधिक्षक, | जुलै अखेर पर्यंत | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. | मुख्य कार्यकारी अधिकारी , जि.प. |

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम-३ मधील तरतूदींच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमार्फत देण्यात येणा-या सेवांमधील एक सेवा वगळण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्र.-संकीर्ण-२०१६/प्र. क्र.६८/समन्वय**

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.

दि. २८ नोव्हेंबर, २०१७.

<u>संदर्भः</u>- १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१)

२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/ प्र. क्र.५३/ समन्वय, दि.२४/११/२०१५.

३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकीर्ण-२०१६ /प्र. क्र.६८/समन्वय, दि.२८/९/२०१६.

**<u>प्रस्तावना: -</u>**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या कलम ३ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियम लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत आणि वेळोवेळी पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमार्फत देण्यात येणाऱ्या ११ सेवा अधिसूचित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

विभागाने यापूर्वी दि. २४/११/२०१५ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती/ जमाती अत्याचारास बळी पडलेल्या सदस्यांना अर्थसहाय्य या योजनेचा समावेश करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी अर्जदारास ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि, पिडीताला कोणतीही औपचारीकता न पाळता तातडीने मदत देणे आवश्यक आहे. सबब योजनेचे स्वरूप तसेच वरील बाबी विचारात घेता, सदर योजना ही महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कलम ३ मधून सेवा वगळण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णयः-

अनुसूचित जाती/ जमाती अत्याचारात बळी पडलेल्या सदस्यांना अर्थसहाय्य ही सेवा विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५३/समन्वय, दि.२४/११/२०१५ च्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ मधून वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२१३१३५०४५९८२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2017.12.13 14:49:39 +05'30'

**( सि. अ. झाल्टे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
२. सर्व सन्माननिय विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय (पत्राने)
७. मा. मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय (पत्राने)
८. मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय.
९. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१३. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
१४. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१७. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१८. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१९. सर्व मंत्रालयीन विभाग
२०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासने.
२१. निवड नस्ती (समन्वय).